# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

MUHS

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
Tel : (0253) 2539161,6639161 Fax : (0253) 2539163,6639163
Website : www.muhs.ac.in, E-mail : establishment@muhs.ac.in

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम. बी. बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**कुलसचिव**

**Dr. Kalidas D. Chavan**
**M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)**
**Registrar**

जा क्र. मआविवि/आर/ ११८० /२०२०

दि.१५ /१२/२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय : कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखासंदर्भात (ड्रेस कोड) बाबत....**

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१/१८ (र.वका.) दि. ८ डिसेंबर २०२०

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकान्वये सर्व शासकीय कार्यालयामध्ये काम करणाऱ्या नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी / कर्मचारी / सल्लागार यांच्यासाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखासंदर्भात (ड्रेस कोड) मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सोबत शासन परिपत्रकाची छायांकित प्रत जोडली आहे.

मला प्राप्त आदेशानुसार विद्यापीठातील सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी /कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच, सदर शासन परिपत्रकात नमूद केलेल्या सुचनांचे पालन करणेबाबत विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

**(डॉ. कालिदास द. चव्हाण)**
**कुलसचिव**

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत कार्यवाहीस्तव :- सर्व विभागप्रमुख, मआविवि, नाशिक / विभागीय कार्यालय

प्रत :

१) कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) प्रतिकुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
३) कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
४) विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर व कोल्हापुर

**सर्व शासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी/ कर्मचारी/ सल्लागार यांच्यासाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखा संदर्भात (ड्रेस कोड) मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१/१८(र.वका.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : ८ डिसेंबर, २०२०

**शासन परिपत्रक:-**

महाराष्ट्र शासनांतर्गत मंत्रालय तसेच मंत्रालयाच्या अधिनस्त सर्व प्रकारची राज्य शासकीय कार्यालये येथून राज्य शासनाचा कार्यभार चालविण्यात येतो. ही सर्व कार्यालये राज्य शासनाचे जनमानसातील प्रतिनिधी म्हणून पाहण्यात येतात. या कार्यालयांमध्ये राज्यभरातील मा.खासदार, मा.आमदार/नगरसेवक इ. लोकप्रतिनिधी, सर्वसामान्य नागरिक, अन्य खाजगी संस्थांचे/ आस्थापनांचे प्रतिनिधी/उच्चपदस्थ अधिकारी इत्यादी त्यांच्या कामासाठी भेट देत असतात. मंत्रालय तसेच सर्व राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी हे कार्यालयास भेट देणाऱ्या संबंधितांशी शासनाचे प्रतिनिधी म्हणून सुसंवाद साधतात. अशा वेळी राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून राज्य शासकीय कार्यालयातील सर्व प्रकारचे अधिकारी/कर्मचारी यांची वेशभूषा हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अत्यंत महत्वाचा भाग म्हणून पाहिला जातो. संबंधितांच्या वेशभूषेवरुनच ते कार्यरत असलेल्या आस्थापनेची एक विशिष्ट छाप भेट देणाऱ्या अभ्यांगतांवर पडते. त्यामुळे शासकीय कार्यालयात काम करीत असताना कार्यालयातील सर्वच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या एकूण व्यक्तीमत्वाबद्दल तसेच वेशभूषेबद्दल जागरुक राहून आपली वेशभूषा ही शासकीय कार्यालयास किमान अनुरुप ठरेल याची सर्वकष काळजी घेणे अभिप्रेत आहे.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, कार्यालयात कामकाज करणारे बरेचसे अधिकारी/कर्मचारी (प्रामुख्याने कंत्राटी तत्वावर कार्यालयात नियुक्त केले जाणारे कर्मचारी तसेच सल्लागार म्हणून शासकीय कामासाठी येणाऱ्या व्यक्ती) हे कार्यालयीन वेळेत उपस्थित असताना शासकीय कर्मचाऱ्याला अनुरुप ठरेल अशा वेशभूषेचा वापर करीत नाहीत. त्यामुळे शासकीय कर्मचा-यांची जनमानसातील प्रतिमा मलिन होते. सर्व शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून एका चांगल्या प्रतीच्या वागणुकीची तसेच व्यक्तीमत्वाची अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येते. या परिस्थितीत जर अधिकारी व कर्मचारी यांची वेशभूषा ही अशोभनीय, गबाळी तसेच अस्वच्छ असेल तर त्याचा अप्रत्यक्ष परिणाम त्याच्या एकंदरीत कामकाजावरही होतो. या सर्व बाबी विचारात धेता मंत्रालय तसेच सर्व राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी (ज्या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना विविध शासकीय परिपत्रकान्वये गणवेष नेमून देण्यात आले आहेत असे शासकीय कर्मचारी वगळता) यांचा कार्यालयातील दैनंदिन पेहराव कशा पध्दतीचा असावा याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

(अ) सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा दैनंदिन पेहराव हा शासकीय कर्मचाऱ्यास शोभनीय असावा.

(ब) सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिधान केलेला पेहराव हा व्यवस्थित असावा. जसे महिला कर्मचाऱ्यांनी कार्यालयात साडी, सलवार/चुडीदार कुर्ता, ट्राऊझर पॅन्ट व त्यावर कुर्ता अथवा शर्ट तसेच आवश्यकता असल्यास दुपट्टा यासह पेहराव करावा. पुरुष कर्मचाऱ्यांनी शर्ट, पॅन्ट/ ट्राऊझर पॅन्ट असा पेहराव करावा. गडद रंगाचे व चित्रविचित्र नक्षीकाम/चित्रे असलेले पेहराव परिधान करु नयेत. तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जीन्स व टी-शर्ट चा वापर कार्यालयामध्ये करु नये.

(क) यापूर्वीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनेनुसार खादीला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आठवड्यातून किमान एकदा (शुक्रवारी) खादी कपड्याचा पेहराव परिधान करावा.

(ड) परिधान केलेला पेहराव स्वच्छ व नीटनेटका असावा, याची दक्षता सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घ्यावी.

(इ) कार्यालयीन वेळेमध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे विहीत नमुन्यातील कार्यालयीन ओळखपत्र दर्शनी भागावर धारण करावे.

(ई) महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयामध्ये शक्यतो चपला, सॅन्डल, बूट (शूज) यांचा वापर करावा. तसेच पुरुष अधिकारी व कर्मचारी यांनी बूट (शूज), सॅन्डल याचा वापर करावा. कार्यालयामध्ये स्लिपर्स चा वापर करु नये.

३. वरील सूचना या सर्व राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी तसेच **कंत्राटी तत्वावर कार्यालयात नियुक्त केले जाणारे कर्मचारी तसेच सल्लागार म्हणून शासकीय कामासाठी येणाऱ्या व्यक्ती** यांनाही लागू राहतील. सर्व मंत्रालयीन विभाग तसेच अधिनस्त शासकीय कार्यालये/ महामंडळ/उपक्रम यांनी त्यांच्याद्वारे नियुक्त करण्यात येणाऱ्या कंत्राटी तत्वावरील अधिकारी/कर्मचारी तसेच व्यावसायिक सल्लागार यांनाही त्यांच्या शासकीय कार्यालयातील नियुक्तीच्या वेळेस या सूचना निदर्शनास आणाव्यात.

४. सदर शासन परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र २०२०१२१११११४४७६१०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SHRIKANT M DESHPANDE

Digitally signed by SHRIKANT M DESHPANDE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=ALL INDIA SERVICES DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fbe6817f24737bd4bc10f54ce9890a85094b471dfa59ad241b9368f0fa7bc5ee, serialNumber=2f6f50e472d07b6d0a7dafbb9041ea434ee8354747392652dc252e4ec6b05ad1, cn=SHRIKANT M DESHPANDE
Date: 2020.12.11 11:20:13 +05'30'

**( श्रीकांत देशपांडे )**
**प्रधान सचिव (प्र.सु र व का.)**

**प्रत :**

१. राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१२. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
१३. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१६. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
२०. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
२१. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती ),
२३. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२०.
२४. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
२५. नॅशनलीस्ट काँग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८.
२६. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
२७. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०००१४.
२८. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४००००४.
२९. भारतीय कम्युनिस्ट(मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३.
३०. महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८.
३१. निवड नस्ती (का.१८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.